**जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयांत नौकाविहाराबाबतचे ठरविण्यासाठी समितीचे गठण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग,**

**शासन आदेश क्र:- नौविप - २०१९/ प्र.क्र. २२६/२०१९/सिं.व्य.(म).**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई .४०००३२.

दिनांक:- ०८ ऑगस्ट, २०१९.

वाचा:- १) राज्याच्या पर्यटन विभागाचे “महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६” यातील तरतुदी.

२) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शासन निर्णय क्र. न्यायाप्र- २०१४/ प्र.क्र. १०५/ क्रीयुसे १, दि. २६.०७.२०१८ मधील तरतुदी.

**प्रस्तावना :-**

जलसंपदा विभागाच्या जलाशयामध्ये नौकानयनास परवानगी देताना वार्षिक परवाना देणे, त्यासाठी शुल्क आकारणी, अनामत रक्कमा निर्धारित करणे तसेच कराराची मुदत वाढविणे व फेर करार करणे इत्यादी बाबींसाठी वरील परिपत्रकाच्या अनुषंगाने कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे. तसेच नौकानयनामुळे पर्यंटनास चालना मिळून प्रकल्पग्रस्तांना व स्थानिक बेरोजगारांस रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतील. शिवाय, नौकाविहाराच्या दरनिश्चिती केल्यामुळे पाटबंधारे विकास महामंडळांच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते. ही बाब विचारांत घेऊन राज्यातील जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयांत नौकाविहारास परवानगी देण्याची सुधारित कार्यपद्धती व दरनिश्चिती करण्याच्या दि. ०८.१२.२००३ च्या शासन परिपत्रक क्र. नौविप - २००३/१३५९/(१५/२००३)/ सिं.व्य. (म.) मध्ये सुधारणा करण्याची बाब जलसंपदा विभागाच्या विचाराधिन होती. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे समितीने संगठण करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य अभियंता व मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद. | अध्यक्ष. |
| २ | अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | सदस्य |
| ३ | अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक | सदस्य |
| ४ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे. | सदस्य |
| ५ | जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे. | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे. | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा:-**

१. राज्यातील जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयांत नौकाविहार, हाऊस बोट, पॉवरसेलिंग व पॅरासेलिंग साहसपूर्ण खेळ यांना परवानगी देण्याची कार्यपद्धती व दरनिश्चिती यामध्ये सहजता व सुटसुटीतपणा आणणे.
२. जलसंपदा प्रकल्पांच्या जलाशयावर परवानगी देताना प्रकल्पग्रस्त व स्थानिक बेरोजगारांस प्राधान्याने रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतील, या बाबीचा प्रामुख्याने विचार होणे.
३. धरण सुरक्षा विषयक नियम तयार करणे तसेच प्रतिबंधित क्षेत्र निश्चित करण्याचे नियम तयार करणे.
४. अन्य राज्यामध्ये अस्तित्वात असलेले नौकाविहार, हाऊस बोट, पॉवरसेलिंग व पॅरासेलिंग, साहसपूर्ण खेळ यांना परवानगी देणे तसेच त्यांचे कार्यचलन या बाबींचा अभ्यास करुन त्यातील महत्त्वांच्या मुद्द्यांचा अहवालामध्ये समाविष्ट करणे. उदा. गोवा, केरळ व जम्मु काश्मीर इ. राज्ये.

जलसंपदा विभागाच्या विविध महामंडळांच्या अधिनियमांतील तरतुदी, राज्याच्या पर्यटन विभागाचे "महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६" यातील तरतुदी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शासन निर्णय क्र. न्यायाप्र- २०१४/ प्र.क्र. १०५/ क्रीयुसे १, दि. २६.०७.२०१८ मधील तरतुदी या विषया संबंधातील यापूर्वीचे शासन निर्णय, परिपत्रके, धरणांच्या जलविद्युत प्रकल्पांच्या सुरक्षेसंबंधी बाबी, नौकानयनाबाबतची मार्गदर्शक सूचना व अनुषंगिक बाबींचा अभ्यास करुन धोरण मसुदा व प्रारुप शासन निर्णय सादर करणे.

५. या संदर्भातील नमूना निविदा पुस्तिका (Standard Bid documents) सादर करणे. (५ प्रतींमध्ये)
६. निविदा मंजुरीचे अधिकार तसेच दर पृथ:करणाची कार्यपद्धती ठरविणे.

**समितीची कार्यपध्दती व बैठका**

जलसंपदा विभागाच्या विविध महामंडळांच्या अधिनियमांतील तरतुदी, राज्याच्या पर्यटन विभागाचे "महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६" यातील तरतुदी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि. २६.०७.२०१८ मधील तरतुदी या विषया संबंधातील यापूर्वीचे शासन निर्णय, परिपत्रके, धरणांच्या जलविद्युत प्रकल्पांच्या सुरक्षेसंबंधी बाबी, नौकानयनाबाबत मार्गदर्शक सूचना व अनुषंगिक बाबींचा अभ्यास करुन धोरण मसुदा शासनास सादर करणे.

समितीच्या बैठकीच्यावेळी पर्यटन विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह विभाग, महसूल व वन विभाग यांच्या अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार आमंत्रित करावे.

**समितीचा कार्यकाळ**

उपरोक्तप्रमाणे समितीने शासनास अहवाल सादर करण्याचा कालावधी २ महिने राहिल.

सर्व महामंडळांना निर्देशित करण्यात येते की, उक्त समितीने मागितलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०८११०१५५५०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.08.08 11:11:11 +05'30'

**(अ.अ.कपोले)**

**शासनाचे उप सचिव.**

**प्रत,**

१. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ.
२. मुख्य अभियंता व मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद.
३. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ
४. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
५. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे.
६. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे.
७. कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे.
८. उप सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव, (क्रिडा) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.